असा. क्र. ११२ रजिस्टर्ड नं. एमएच/एमबीआय-साऊथ/२०/९९

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

शनिवार, एप्रिल २४, १९९९/वैशाख ४, शके १९२१

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार-ब

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

ग्रामविकास व जलसंधारण विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २४ एप्रिल १९९९

**अधिसूचना**

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१.**

क्रमांक झेडपीए. १०९९/ सीआर-७२(१) / ०५.––ज्याअर्थी, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ चा महाराष्ट्र अधिनियम एकेचाळीस) यांच्या कलम ४ अन्वये काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्रमांक पुनर्रचना. ३०९७/३६७/सीआर-७१/म-१०, दिनांक २४ एप्रिल १९९९ द्वारे विद्यमान परभणी महसुली जिल्ह्याचे विभाजन करून परभणी व हिंगोली अशा नवीन महसुली जिल्ह्याची रचना करण्यात आली आहे; आणि ज्याअर्थी महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (१९६२ चा महाराष्ट्र अधिनियम पाच) (यात यापुढे ज्याचा निर्देश–" उक्त अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम ४ अन्वये उक्त संहितेअन्वये एखाद्या जिल्ह्यामध्ये घटीत करण्यात आलेले किंवा रचना करण्यात आलेले प्रत्येक स्थानिक क्षेत्र हे (परंतु त्या त्या वेळी अंमलात आलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे किंवा तद्न्वये रचना केलेल्या किंवा स्थापन केलेल्या एखाद्या महानगरपालिकेच्या, नगरपालिकेच्या, एखाद्या छावणीच्या किंवा अधिसूचित क्षेत्र समितीच्या हद्दी त्यामधून वगळून) उक्त अधिनियमांच्या प्रयोजनार्थ एक जिल्हा असेल;

आणि ज्याअर्थी, उपरोक्तप्रमाणे परभणी आणि हिंगोली अशा दोन नवीन महसुली जिल्ह्यांची रचना लक्षात घेऊन उक्त अधिनियमांच्या प्रयोजनार्थ वर उल्लेखिलेल्या दोन नवीन महसुली जिल्ह्यांसारखे असतील असे दोन नवीन जिल्ह्यांची रचना करणे आवश्यक आहे;

त्याअर्थी, आता उक्त अधिनियमांचे कलम ६ आणि कलम २५४ च्या पोट-कलम (१) चा खंड (अ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे दिनांक १ मे १९९९ पासून—

(अ) विद्यमान परभणी जिल्ह्याचे अनुक्रमे परभणी व हिंगोली या नवीन महसुली जिल्ह्यांच्या हद्दीशी सहव्यापी असलेल्या (त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे किंवा तदन्वये रचना केलेल्या किंवा स्थापन केलेल्या एखाद्या महानगरपालिकेच्या, नगरपालिकेच्या, छावणीच्या किंवा अधिसूचित क्षेत्र समितीच्या हद्दी, कोणत्याही असल्यास वगळून) परभणी व हिंगोली जिल्ह्यांमध्ये विभाजन करीत आहे, आणि

(ब) परभणी व हिंगोली या प्रत्येक नवीन जिल्ह्याकरिता प्रत्येकी एक जिल्हा परिषद असेल असा निदेश देत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**विद्याधर कानडे**
शासनाचे सचिव.

## ग्रामविकास व जलसंधारण विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २४ एप्रिल १९९९

## अधिसूचना

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१.**

क्रमांक झेडपीए. १०९९/ सीआर-७२(२) / ०५.—ज्याअर्थी, महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (१९६२ चा महाराष्ट्र अधिनियम पाच) (त्यात यापुढे ज्याचा " उक्त अधिनियम " असा निर्देश केलेला आहे) यांचे कलम ६ आणि कलम २५४ च्या पोट-कलम (१) चा खंड (अ) अन्वये काढण्यात आलेली, शासकीय अधिसूचना, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्रमांक झेडपीए-१०९९/सीआर-७२(१)/०५, दिनांक २४ एप्रिल १९९९ अन्वये, अनुक्रमे परभणी आणि हिंगोली या महसुली जिल्ह्यांच्या हद्दीशी सहव्यापी असलेल्या हद्दीसह (त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधीद्वारे किंवा तद्न्वये रचना करण्यात आलेली आहे किंवा स्थापन करण्यात आलेली एखादी महानगरपालिका, नगरपालिका, छावणी किंवा एखादी अधिसुचित क्षेत्र समिती यांच्या कोणत्याही असल्यास हद्दी वगळून.) दिनांक १ मे १९९९ पासून, परभणी व हिंगोली या दोन जिल्ह्यांची रचना करण्यात आली आहे;

आणि ज्याअर्थी, उपरोक्त दोन्ही जिल्ह्यामध्ये गटांची रचना करणे आवश्यक आहे;

त्याअर्थी, आता भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २४३ चा खंड (ग) आणि उक्त अधिनियमांच्या कलम पाच द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे यासोबतच्या अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रत्येक जिल्ह्याकरिता त्या अनुसूचीच्या स्तंभ (४) मध्ये त्यांच्यासमोर विनिर्दिष्ट केलेल्या गटांची त्याच स्तंभामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या नावांसह आणि उक्त अनुसूचीच्या स्तंभ (३) मध्ये त्या प्रत्येकासमोर विनिर्दिष्ट केलेल्या स्थानिक क्षेत्राचा समावेश असलेल्या हद्दीसह रचना करीत आहे, आणि त्या प्रयोजनाकरिता, शासकीय अधिसूचना ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्रमांक पीएसई.१०९६/सीआर-११४/०५, दिनांक १९ सप्टेंबर १९९६ यामध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहे :—

उक्त अधिसूचनेच्या अनुसूचीमध्ये परभणी जिल्ह्याशी संबंधित असलेल्या नोंद क्रमांक " १६ " ऐवजी पुढील नोंदी दाखल करण्यात येतील:—

| | | |
|---|---|---|
| " १६ परभणी | (१) परभणी तालुका | (१) परभणी |
| | (२) गंगाखेड तालुका | (२) गंगाखेड |
| | (३) पाथरी तालुका | (३) पाथरी |
| | (४) सेलू तालुका | (४) सेलू |

| | | | |
|---|---|---|---|
| | | (५) पालम तालुका | (५) पालम |
| | | (६) पूर्णा तालुका | (६) पूर्णा |
| | | (७) जिंतूर तालुका | (७) जिंतूर |
| १६अ | हिंगोली | (१) हिंगोली तालुका | (१) हिंगोली |
| | | (२) कळमनुरी तालुका | (२) कळमनुरी |
| | | (३) बसमत तालुका | (३) बसमत |
| | | (४) औंढा (नागनाथ) तालुका | (४) औंढा (नागनाथ) |
| | | (५) सेनगांव तालुका | (९) सेनगांव |

## अनुसूची

| अ.क्र. (१) | जिल्हा (२) | स्थानिक क्षेत्र/तालुका (३) | गटाचा क्रमांक व नाव (४) |
|---|---|---|---|
| १६ | परभणी | (१) परभणी तालुका | (१) परभणी |
| | | (२) गंगाखेड तालुका | (२) गंगाखेड |
| | | (३) पाथरी तालुका | (३) पाथरी |
| | | (४) सेलू तालुका | (४) सेलू |
| | | (५) पालम तालुका | (५) पालम |
| | | (६) पूर्णा तालुका | (६) पूर्णा |
| | | (७) जिंतूर तालुका | (७) जिंतूर |
| १६अ | हिंगोली | (१) हिंगोली तालुका | (१) हिंगोली |
| | | (२) कळमनुरी तालुका | (२) कळमनुरी |
| | | (३) बसमत तालुका | (३) बसमत |
| | | (४) औंढा (नागनाथ) तालुका | (४) औंढा (नागनाथ) |
| | | (५) सेनगांव तालुका | (९) सेनगांव |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**विद्याधर कानडे,**

## ग्रामविकास व जलसंधारण विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २४ एप्रिल १९९९

### आदेश

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१.**

क्रमांक झेडपीए. १०९९/ सीआर-७२(३) / ०५.—ज्याअर्थी, महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (१९६२ चा महाराष्ट्र पाच) (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अधिनियम " असा करण्यात आलेला आहे) याचे कलम ६ व कलम २५४ च्या पोट-कलम (१)चा खंड (अ) अन्वये काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्रमांक झेडपीए. १०९९/सीआर-७२(१)/०५, दिनांक २४ एप्रिल १९९९ द्वारे पूर्वीच्या परभणी जिल्ह्याचे विभाजन करून परभणी व हिंगोली अशा दोन नवीन जिल्ह्यांची रचना करण्यात आली आहे. उक्त प्रत्येक नवीन जिल्ह्याकरिता एका उत्तराधिकारी जिल्हा परिषदेची स्थापना करण्यात आली आहे;

आणि ज्याअर्थी, अशा विभाजनामुळे पूर्वीच्या परभणी जिल्ह्याची दोन जिल्ह्यांत करण्यात आलेली विभागणी परभणी जिल्हा परिषदेच्या सदस्यांच्या पदावधी दरम्यान झालेली आहे;

आणि ज्याअर्थी, उपरोक्त परिस्थितीत उक्त अधिनियमान्वये अशा जिल्हा परिषदांची योग्य प्रकारे रचना करण्यात येईपर्यंत, उत्तराधिकारी जिल्हा परिषदा व त्यासह पंचायत समित्या, स्थायी समित्या किंवा विषय समित्या किंवा इतर अन्य समित्या स्थापन केल्या असल्यास, त्यांच्या अधिकाराचा वापर करण्याकरिता व कामे पार पाडण्याकरिता प्रशासकाची नेमणूक करण्यासाठी तरतूद करण्यास राज्य शासन सक्षम आहे;

त्याअर्थी, आता, उक्त अधिनियमाच्या कलम २५५ च्या पोट-कलम (२) च्या खंड (चार) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे दिनांक १ मे १९९९ पासून उक्त अधिनियमान्वये अशा संबंधित जिल्हा परिषदांची योग्य प्रकारे रचना करण्यात येईपर्यंत यासोबतच्या अनुसूचीच्या स्तंभ (१) मध्ये नमूद केलेल्या अधिकाऱ्यांची त्या अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये त्यांच्यासमोर अनुक्रमे विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या उत्तराधिकारी जिल्हा परिषदांची व त्यासह पंचायत समित्या, स्थायी समित्या किंवा विषय समित्या किंवा इतर अन्य समित्या स्थापन केल्या असल्यास त्यांची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी नियुक्ती करीत आहे.

## अनुसूची

| अधिकारी (१) | जिल्हा परिषदा (२) |
| --- | --- |
| (१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी. | परभणी जिल्हा परिषद (पंचायत समित्या, स्थायी समिती किंवा विषय समित्या किंवा इतर अन्य समित्या स्थापन केल्या असल्यास त्यांसह). |
| (२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली. | हिंगोली जिल्हा परिषद (पंचायत समित्या, स्थायी समिती किंवा विषय समित्या किंवा इतर अन्य समित्या स्थापन केल्या असल्यास त्यांसह). |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**विद्याधर कानडे,**
शासनाचे सचिव.

## RURAL DEVELOPMENT
## AND WATER CONSERVATION DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 24th April 1999

*NOTIFICATION*

MAHARASHTRA ZILLA PARISHADS AND PANCHAYAT SAMITIS ACT, 1961.

No. ZPA. 1099/ CR-72(1)/05.—Whereas, by Government Notification, Revenue and Forests Department, No. REN. 4097/367/CR-71/M-10, dated the 24th April 1999, issued under section 4 of the Maharashtra Land Revenue Code, 1966 (Mah. XLI of 1966), the existing revenue District of Parbhani has been split up to constitute two new revenue Districts of Parbhani and Hingoli ;

And whereas, under section 4 of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961 (Mah.V of 1962) (hereinafter referred to as "the said Act"), every local area formed or constituted into a district under the said Code (but excluding therefrom the limits of a municipal corporation, municipality, a cantonment or a notified area committee, constituted or established by or under any law for the time being in force) shall be a District for the purposes of the said Act;

And whereas, in view of the constitution of two new revenue Districts of Parbhani and Hingoli as aforesaid, it is necessary to constitute two new Districts for the purposes of the said Act which shall correspond to the aforementioned two new revenue Districts;

Now, therefore, in exercise of the powers conferred by section 6 and clause (*a*) of sub-section (*1*) of section 254 of the said Act, the Government of Mahaarashtra, with effect from the 1st May 1999, hereby —

(*a*) divides the existing district of Parbhani into the Parbhani and Hingoli Districts with the limits co-extensive with the limits of the new

revenue Districts of Parbhani and Hingoli, respectively (excluding the limits, if any, of a municipal corporation, municipality, a cantonment or a notified area committee, constituted or established by or under any law for the time being in force); and

(*b*) directs that there shall be a Zilla Parishad for each of the new Districts of Parbhani and Hingoli.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

V. K. KANADE,
Secretary to Government.

## RURAL DEVELOPMENT
## AND WATER CONSERVATION DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 24th April 1999.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA ZILLA PARISHADS AND PANCHAYAT SAMITIS ACT, 1961.

No. ZPA. 1099/ CR-72(2)/05.—Whereas, by Government Notification, Rural Development and Water Conservation Department, No. ZPA. 1099/ CR-72(1)/05, dated the 24th April 1999, issued under section 6 and clause (*a*) of sub-section (*1*) of section 254 of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961 (Mah. V of 1962) (hereinafter referred to as "the said Act"), two new Districts of Parbhani and Hingoli with the limits co-extensive with the limits of the revenue Districts of Parbhani and Hingoli respectively (excluding the limits, if any, of a municipal corporation, municipality, a cantonment or a notified area committee, constituted or established by or under any law for the time being in force) have been constituted with effect from the 1st May 1999 ;

And whereas, it is necessary to constitute Blocks in each of the aforesaid two Districts;

Now, therefore, in exercise of the powers conferred by clause (*c*) of article 243 of the Constitution of India read with section 5 of the said Act, the Government of Maharashtra hereby constitutes in every District specified in column (2) of the Schedule hereto, the number of blocks specified against them in column (4) thereof with the names specified in the same column, and the limits comprising the local areas specified against each of them in column (3) of the said Schedule and for that purpose further amends Government Notification, Rural Development and Water Conservation Department, No. PSE. 1096/CR-114/05, dated the 19th September 1996, as follows, namely :—

In the Schedule to the said notification, for the entry at Serial No. 16, relating to 'Parbhani' District, the following entries shall be substituted, namely :—

| | | |
|---|---|---|
| "16 Parbhani ... | (1) Parbhani Taluka | (1) Parbhani |
| | (2) Gangakhed Taluka | (2) Gangakhed |
| | (3) Pathri Taluka | (3) Pathri |
| | (4) Sailu Taluka | (4) Sailu |
| | (5) Palam Taluka | (5) Palam |
| | (6) Purna Taluka | (6) Purna |
| | (7) Jintur Taluka | (7) Jintur |
| 16A Hingoli ... | (1) Hingoli Taluka | (1) Hingoli |
| | (2) Kalamnuri Taluka | (2) Kalamnuri |
| | (3) Basmath Taluka | (3) Basmath |
| | (4) Aundha (Nagnath) Taluka | (4) Aundha (Nagnath) |
| | (5) Sengaon Taluka | (5) Sengaon". |

*Schedule*

| Sr. No. (1) | District (2) | Local Area/Taluka (3) | No. and Name of Blocks (4) |
|---|---|---|---|
| 16 | Parbhani ... | (1) Parbhani Taluka | (1) Parbhani |
| | | (2) Gangakhed Taluka | (2) Gangakhed |
| | | (3) Pathri Taluka | (3) Pathri |
| | | (4) Sailu Taluka | (4) Sailu |
| | | (5) Palam Taluka | (5) Palam |
| | | (6) Purna Taluka | (6) Purna |
| | | (7) Jintur Taluka | (7) Jintur |

| Sr. No. (1) | District (2) | Local Area/Taluka (3) | No. and Name of Blocks (4) |
|---|---|---|---|
| 16A | Hingoli ... | (1) Hingoli Taluka | (1) Hingoli |
| | | (2) Kalamnuri Taluka | (2) Kalamnuri |
| | | (3) Basmath Taluka | (3) Basmath |
| | | (4) Aundha (Nagnath) Taluka | (4) Aundha (Nagnath) |
| | | (5) Sengaon Taluka | (5) Sengaon |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

V. K. KANADE,
Secretary to Government.

## RURAL DEVELOPMENT
## AND WATER CONSERVATION DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 24th April 1999.

### Order

MAHARASHTRA ZILLA PARISHADS AND PANCHAYAT SAMITIS ACT, 1961.

No. ZPA. 1099/ CR-72(3)/05.—Whereas, by Government Notificatio[n] Rural Development and Water Conservation Department, No. ZPA. 109[9/] CR-72(1)/05, dated the 24th April 1999, issued under section 6 and claus[e] (*a*) of sub-section (*1*) of section 254 of the Maharashtra Zilla Parishad[s] and Panchayat Samitis Act, 1961 (Mah. V of 1962) (hereinafter referre[d] to as " the said Act "), two new Districts of Parbhani and Hingoli hav[e] been constituted by dividing the former District of Parbhani and a successo[r] *Zill Parishad* has been established for each of the said new Districts;

And whereas, by reson of such division, the former District Parbhan[i] stood split up into two Districts during the term of office of the councillor[s] of the Parbhani *Zilla Parishad;*

And whereas, in the circumstances aforesaid, the State Government is competent to provide for the appointment of Administrators to exercise the powers and to perform the functions of the successor *Zilla Parishads* including those of the Panchyat *Samitis*; the Standing Committees or Subject Committees or other Committees appointed, if any, until such *Zilla Parishads* are in due course constituted under the said Act;

Now, therefore, in exercise of the powers conferred by clause (*iv*) of sub-section (*2*) of section 255 of the said Act, the Government of Maharashtra hereby appoints with effect from the 1st day of May 1999, the officers mentioned in column (1) of the Schedule hereto to perform the duties and functions of the successor *Zilla Parishads* including those of Panchayat *Samitis*, the Standing Committees or Subject Committees of other Committees, if any, respectively specified against them in column (2)

*Schedule*

| Officers (1) | Zilla Parishads (2) |
| --- | --- |
| (1) Chief Executive Officer, Zilla Parishad, Parbhani. | Parbhani Zilla Parishad (including those of Panchayat Samitis, the Standing Committee or Subject Committees or other Committees appointed, if any). |
| (2) Chief Executive Officer, Zilla Parishad, Hingoli. | Hingoli Zilla Parishad (including those of Panchayat Samitis, the Standing Committee or Subject Committees or other Committees appointed, if any). |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

V. K. KANADE,
Secretary to Government.